# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 15/07/2021 (गुरूवार)

(सकाळ)

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत 01 कि.मी अंतरावर गांधी चौक नरखेड येथे दिनांक 14/07/2021 चे 23.00 वा. ते 23. 30 वा. दरम्यान फिर्यादी/जखमी नामे– साहील रईस षहा वय 21 वर्ष रा. वार्डे 15, नरखेड याचा मित्र सोनू शहा हे दोघेही जयस्तंभ चौक, नरखेड कडे जात असता आरोपी क्र. 1) रॉबीन नारनवरे, वय 25 वर्ष, रा. वार्ड क्र. 02 पेठ विभाग नरखेड हा शर्ट काढून फिरत होता. त्याला सोनु शहा याने ''क्यु भाई शर्ट उतारकर घुम रहा है गर्मी हो रही है क्या'' असे म्हटले. या कारणावरून आरोपी क्र. 1 ने शिवीगाळ केली. फिर्यादीने रॉबीन यास ''तु अभी नशेमे है, कल सबरे बात करेंगे'' असे म्हटले असता त्याचा राग मनात धरून रॉबीन नारनवरे व त्याचा मित्र आरोपी क्र. 2. शुभंम डोंगरे, वय 26 वर्ष, रा. वार्ड क्र. 5, नरखेड याने गांधी चौक नरखेड येथील पप्पु शेख याच्या पानठेल्या समोर फिर्यादीच्या पोटात चाकू मारून जिवे मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीतांविरुध्द कलम 307, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. ब्रम्हदेव देशमुख 7276209799 हे करीत आहे.

### चोरी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 20 कि. मी. अंतरावरील मौजा पारडगाव शिवार येथे दि. 13/07/2021 चे 18.30 वा. ते दि. 14/07/2021 चे 06.00 वा. चे सुमारास फिर्यादी नामे– प्रविन कृष्णराव बोटकेवार वय 55 वर्ष रा. नंदनवन कॉलनी नागपूर यांचे शेतातील घरातुन अज्ञात आरोपीने शेतीचे अवजार लहान मोठे लोंखडी सब्बल, पान्हे, पेनचीस, हातोडा कि. 1,500/–रु. इन्डेन कंपनीचा गॅस सिलेंडर व रेगूलेटर कि. 2,000/– रु. तसेच ट्रैक्टरचे फास व तुटलेली फाड कि. 1,200/–रु. एक टेक्समो कंपनीचा जुनी पान बोडी मोटार कि. 7,000/–रु. दोन खराब बॅटरी अशा तीन बॅटरी कि. 4,500/–रु. ट्रक चा लोंखडी जॅक कि. 500/–रु. असा एकुण कि. 16,700/–रु. चा मुद्देमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथ आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा हरिश यंगलवार मो नं. 9511668478 हे करीत आहे.

## आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपीतांविरूध गुन्हा नोंद

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत 04 कि. मी. अंतरावरील मौजा टाकळघाट येथे दिनांक 13/07/2021 चे 13:30 वा. पूर्वी आरोपी 1) राजेश नारायण सूर्यवंशी, वय 29 वर्षे, रा. टाकळघाट ता. हिंगणा जि. नागपूर 2) लताबाई नारायण सूर्यवंशी, वय 55 वर्षे, रा. टाकळघाट ता. हिंगणा जि. नागपूर 3) माधवी श्रीकांत लाडसे, रा. भद्रावती जि. चंद्रपूर व 4) श्रीकांत लाडसे, रा. भद्रावती जि. चंद्रपूर यांनी संगणमत करून पिडीत/मृतक नामे– सौ. नेहा राजेश सूर्यवंशी(मृतक), वय 23 वर्ष, रा. वार्ड न. 04 टाकळघाट हिला ''तुझे लग्न लॉकडाउन मध्ये झाल्याने तुझया बापाचा पैसा वाचला, आंदन आले नाही वाचलेला पैसा तुझया बापाला मागून आण'' असा मानसिक त्रास दिल्याने मानसिक त्रासाला कंटाळून पिडीत मुलीने घरी कोणी नसतांना गळफास लावून आत्महत्या केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौ. शारदा अशोक चव्हान, वय 47 वर्षे, रा. साईबाबा मंदीर समोर, शिवाजी वार्ड बल्लारशा ता. जि. चंद्रपूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 306, 498(अ), 34 भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री दिनकर दराडे 7972228219 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 02 कि. मी. अंतरावरील मौजा बुटीबोरी सेंट क्लारेट शाळा समोर येथे दिनांक 14/07/2021 चे 19:30 वा. दरम्यान मृतक ॲक्टीव्हा गाडी कं एमएच 40 बीबी3181 चा चालक रंजित मगणलाल मेश्राम वय 34 वर्ष रा.वार्ड कं 18 ग्राम कटोरी त.खैरलांजी जि.बालाघाट (एमपी) ह मु व्यंकटेश सिटी बुटीबोरी ता.हिंगणा जि.नागपुर नी विरूध्द दिशेने व्यंकटेश सिटी बुटीबोरी येथे जात असतांना सेंट क्लारेट स्कुल बुटीबोरी जवळिल स्पिड ब्रेकर जवळ त्याचे ताब्यातिल मोसा उसळुन अनियंत्रित होउन रोडच्या बाजुला असलेल्या डिवाडरला धडक मारून गंभीररित्या जखमी होउन स्वताहा मरणास कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शरद लक्ष्मण कुळमते वय 32 वर्ष, रा सातगाव किन्हाळा ता.हिंगणा जि. नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि उघडे मो नं 83559 47473 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 12 कि. मी. अंतरावर मौजा दुल्हारा जंगल शिवार मौरपाला तलाव येथे दिनांक 11/07/2021 चे 03.30 वा. दरम्यान 1) फरिन हुसेन जिवाजी वय 40 वर्ष व 2) सोनिया रंगलाल नागपूरे वय 21 वर्ष दोन्ही रा. मेहंदीबाग कॉलनी, बिनाकी मंगलवारी, नागपूर हे आपले नातेवाईकांसोबत मौरपाला तलाव दुलारा येथे पिकनिक साठी आले होते. यातील मृतक क्र. 2 हि हात पाय धुण्यासाठी तलावामध्ये उतरली असता तिचा पाय घसरून ती तलावामध्ये पडली. तिला वाचवण्याकरीता यातील मृतक क्र. 1 हि गेली असता तिचा पाय घसरून ती सुध्दा तलावामध्ये पाण्यात पडली असता नातेवाईकांनी त्यांना पाण्यातुन काढून डॉ. पाठक हॉस्पीटल रामटेक येथे उपचाराकरिता दाखल केले. त्यानंतर पुढील उपचारा दरम्यान कामी बदर हॉस्पीटल नागपूर येथे दाखल केले असता तेथिल डॉक्टरांनी दि. 11/07/2021 चे 19.00 वा. तपासून दोघांनाही मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अफजल वल्द सज्जाद हुसेन महदी वय 45 वर्ष रा. मेहंदीबाग कॉलनी मंगलवारी नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. देवलापार येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार अशोक उईके मो क्र. 7720824629 हे करीत आहे.

2) पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 3 कि. मी. अंतरावर मौजा तास गावाचे बाहेर कैनल जवळ ग्राम पंचायत विहीर येथे दिनांक 13/07/2021 चे 21.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– पुरूशोत्तम तिमाजी डडमल वय 38 वर्ष रा. तास ता. भिवापूर हे तास गावातील पोलीस पाटील असून त्यांचा गावातील राहणारा दिपक मारबते यांची पत्नी नामे.– सौ. आरती दिपक मारबते (मृतक) वय 24 वर्ष रा. तास ही गावाचे बाहेर कैनल जवळ असलेल्या ग्राम पंचायतची सरकारी विहीरीच्या पाण्यात उडी मारून बुडून मरण पावली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापुर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पो.नि. श्री महेश एस. भोरटेकर पो.स्टे भिवापूर मो.न. 9823264005 हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 14 कि.मी अंतरावर पोल्ट्री फार्म गोंडी दिग्रस येथे दिनांक 13/07/2021 चे 18:30 वा. ते दिनांक 14/07/2021 चे 03:00 वा. दरम्यान फिर्यादींचा मोठा भाउ नामे– तुषार प्रकाश मालखेडे (मृतक) वय 28 वर्ष, रा. फैलपूरा काटोल हा आईला ''मि पोल्ट्री फॉर्म येथे जाउन येतो'' असे सांगून त्याचे दोन्ही फोन घरीच ठेवून गोंडी दिग्रस येथे गेला होता. परंतू उशीर रात्री पर्यंत तो न आल्याने त्याचे लाहन भाउ गौरव मालखेडे व वडिल प्रकाश मालखेडे व फिर्यादीचे दोन मित्र यांनी पोल्ट्री फॉर्म गोंडी दिग्रस येथे जाउन पोल्ट्री फॉर्मवर पाहीले आसता फिर्यादीचा भाउ तुषार मालखेडे हा शेडमध्ये नायलॉन दोरीच्या सहयाने गळफास घेतल्यानंतर मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गौरव प्रकाश मालखेडे, वय 29 वर्ष, रा. फलपूरा काटोल यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. काटोल येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोना गौरव आगरकर पो स्टे काटोल मो न 9130100564 हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. कन्हान :– दिनांक 13/07/2021 चे 19.30 वा. ते 20.00 दरम्यान फिर्यादी/पीडित वय 24 वर्ष हि काही कामानिमित्य तिच्या घरून विवेकानंद नगर येथे जात असतांना आरोपी नामे– शुभम कृष्ण वंजारी, वय 25 वर्ष, रा. पटेलनगर कन्हान हा मागुन येवुन फिर्यादी हिला बोलायचे आहे असे म्हणुन तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 354 भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा रामटेके मो. क्र. 8485861442 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर